अलीकडेच एका मुलाखतीत अमिताभ बच्चन सांगत होता की, त्याचे वडील वयाच्या ९२व्या वर्षी दुपारचा निवांत वेळ त्याचे जुने चित्रपट पाहण्यात व्यतीत करतात. आता हे फक्त अमिताभ किंवा त्याच्या वडिलांच्याच बाबतीत घडतंय असं नाही. कपूर घराण्याचाही असाच इतिहास आहे. पापाजी पृथ्वीराज कपूर यांच्या अखेरच्या दिवसांत ते खूप आजारी होते. त्यावेळी थोरला मुलगा बलराज (राज कपूर) च्या चित्रपटातले आपल्याला आवडणारे प्रसंग, गीतं पाहण्यात आपलं मन रमवायचे. त्यांचं आवडतं गाणं होतं. 'हम न रहेंगे, तुम न रहोंगे, फिर भी रहेगी निशानियां...'

आठवलं ना? राज कपूर-नर्गिस रिमझिम पावसात एका छत्रीखाली एकमेकांच्या डोळ्यांत पाहात हे गाणं म्हणत असतात आणि शेजारून रेनकोट घातलेली तीन छोटी मुलं शाळेत जाताना दिसतात. या दृश्याबरोबर कानावर शब्द येता. 'प्यार हुआ इकरार हुआ है, प्यार से फिर क्यू डरता है दिल, कहता है दिल रस्ता मुश्कील मालूम नही है कहाँ मंजील...' पावसात चित्रित केलेलं हे गीत पावसावर नाही. हे प्रणयगीत आहे. तरीही कानावर हे गाणं पडलं की नजरेसमोर एका छत्रीतली राज-नर्गिसची जोडीच का उभी राहाते?

आता आपल्याकडेही पावसाळा सुरू झालाय. हिंदी चित्रपटात पावसाचं एक अनन्यसाधारण महत्त्व आहे. पावसाच्या धारा अंगावर घेत प्रणयगीत गाणारी नायक-नायिकेची जोडी दिसली नाही तर काहीतरी चुकल्यासारखं वाटतं. हे महत्त्व मान्य करूनच पावसाशी निगडित चित्रपटगीतांच्या मधुर स्मृतींना आज आपण उजाळा देणार आहोत.

पावसाळी चित्रपटगीतांबद्दल बोलताना दादामुनींना एकाच गीताची प्रकर्षाने आठवण झाली. नुसते गाण्याचे बोल हाताच्या चुटकीवर बोलताना दादामुनींच्या वृद्ध चेहऱ्यावरची एक एक सुरकुती नाचू लागते, नजर चमकते आणि ते गाऊ लागतात–

'एक लडकी भीगी भागी सी
सोती रातों में जागी सी
मीली एक अजनबी से
कोई आगे न पिछे
तुम ही कही ये क्या बात है...'

*चलती का नाम गाडी* चित्रपटातलं हे गीत. यात प्रणय आहे, थट्टा आहे. या चित्रपटाचे संगीतकार एस. डी. बर्मन. पण गीताची बंदिश गांगुलीबंधूंनी खंडवा येथे ऐकलेल्या एका लोकगीताची होती. अशोककुमारनी ती बंदिश बर्मनदांना ऐकवली आणि त्यांच्या तोंडून शब्द निघाले भालोई आछेन... म्हणजे छानच आहे.

किशोरकुमारना या गाण्याला उडती चाल हवी होती. चित्रपट हलका-फुलका, त्यात नटखट किशोरकुमारवर चित्रित केलेलं गीत. मग ते संथ-गंभीर असून कसं चालणार? यावर बर्मनदांनी एक मार्ग काढला. गॅरेजमध्ये गायलेल्या या गीताला अधूनमधून हत्यारांचा ठेका, गाडीच्या हॉर्नचं पार्श्वसंगीत द्यायचं. त्यामुळे हे गीत वेगळं तर झालंच शिवाय किशोरकुमारलाही सादर करताना अधिक वाव मिळाला. जोडीला चिंब भिजलेल्या मधुबालाची मोहक अदाकारी... मग काय विचारता. पावसाच्या सरींच्या साथीने चित्रित केलेलं हे गीत यादगार झालं.


घात: मनोज वाजपेयी-तब्बू


गाईड : देव आनंद

तसं पाहिलं तर गेल्या पन्नास वर्षांत बनलेल्या बहुतेक प्रत्येक चित्रपटात एखादं तरी वर्षागीत असतंच. पण ती सगळी दखलपात्र असतातच असं नाही. पण खिडकीबाहेर पडणाऱ्या मुसळधार पावसाच्या साक्षीने आपल्याला अशा आठवणीतल्या वर्षागीतांची आठवण ताजी करायची आहे.

मुंबईतल्या हिराबाजारच्या आसपासचा परिसर आजही ऑपेरा हाऊस नावाने ओळखला जातो आणि आज त्या ठिकाणी चित्रपट प्रदर्शित होत नसले तरी ऑपेरा हाऊस थिएटर आजही तिथेच आहे. १९४०च्या दशकात तिथे पृथ्वी थिएटरची नाटकं व्हायची. तिथेच राज कपूरने आपल्या पहिल्या चित्रपटाची योजना आखली. बेस्टमध्ये कंडक्टर म्हणून काम करणारे पण पुढे गीतकार बनलेले हसरत जयपुरी (जयपूर), हैदराबादचे शंकर, वलसाडचे चिरतरुण संगीतकार जयकिशन पंचाल, सरकारी नोकरी सोडून आलेले यूपीचे शैलेंद्र, निळ्या डोळ्यांत आकाशाला गवसणी घालण्याचे स्वप्न बाळगणारा राज कपूर आणि आपल्या धीरगंभीर आवाजात ऐकणाऱ्याच्या काळजाला हात घालणारी गीतं गाणारे मुकेश. इतक्यांच्या प्रतिभा एकत्र आल्यावर *बरसात*चं शीर्षकगीत आकारलं-साकारलं. गीताचे शब्द होते – 'बरसातमें हम से मिले तुम सजन तुम से मिले हम बरसात में...' चित्रपट संगीतकारांना प्रिय असलेल्या भैरवी रागात जयकिशनने चाल बांधली खरी पण राज कपूरला काहीतरी उणीव जाणवत होती. तास न् तास ते स्वतःलाच प्रश्न विचारायचे 'काय बरं कमी वाटतंय?'

अचानक ढोलकीवर थाप मारत शंकरच्या तोंडून शब्द निघाले: 'ताक धीना धीन...' आणि राज कपूरने आनंदाने उडीच मारली. बस्स! हेच हवं होतं. अशाप्रकारे राज कपूरच्या पहिल्या चित्रपटाचं शीर्षकगीत जन्माला आलं आणि अविस्मरणीय ठरलं. आज त्यानंतर इतकी वर्षागीतं कानावरून गेली पण पावसाचं गाणं म्हटल्यावर 'बरसात में...'चीच आठवण व्हावी. खुद्द राज कपूरनेही आपल्यानंतरच्या अनेक चित्रपटांतून पावसातील एखादं तरी गीत दिलेलं आहे.

राज कपूरच्याच *बूट पॉलीश*मधलं

आणखी एक हिट वर्षागीत. संगीतकार शंकर-जयकिशन. डेव्हिडवर चित्रित केलेल्या गीताचे शब्द आहेत– 'लपक झपक तू आरे बदरवा, सर की खेती सूख रही है, बरस बरस तू कोर बदरवा...' या गीताची चाल आणि ठेका, गीत पडद्यावर प्रत्यक्ष पाहताना अधिक श्रवणीय वाटतं.

डेव्हिडवर चित्रित या गीताचं चित्रीकरण करताना डेव्हिडच्या हातांचा ताळमेळ तबला वादकाच्या समेबरोबर बसत नव्हता. डेव्हिडला त्यासाठी किती टेक द्यावे लागले होते. आपल्या कारकीर्दीतलं सर्वात कठीण गीतदृश्य अशी खुद्द डेव्हिडने चारचौघात कबुली दिली होती. या गीतात डेव्हिड पोलीस कोठडीत असतो, त्यामुळे पडद्यावर पाऊस दाखवण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

पावसावर चित्रित सर्वात सौम्य आणि अत्यंत सुंदर गीत संगीतकार रोशनने *बरसात की रात* (१९६०) मध्ये तयार केलं. भारत भूषण नायक होता. भूमिका एका शायरची होती. व्यावसायिक कव्वालांच्या जीवनावर बेतलेलं कथानक. त्यामुळे एकाहून एक श्रवणीय गीतं, कव्वाली यात ऐकायला मिळतात. 'ना तो कारवाँ की तलाश है...' ही कव्वाली तर अप्रतिमच आहे. या चित्रपटात भारतभूषण आणि रोशन यांच्यात ताळमेळ चांगला जमलाय. रोशनला दोस्तीखातर भारतभूषणने सल्ला दिला की शीर्षक गीत प्रणय रसातलं पण मादक आणि सौम्य असावं आणि मग जिंदगीभर नही भूलेगी वो बरसात की रात...' हे धुंद गीत जन्माला आलं.

देव आनंदवर चित्रित एक अत्यंत सुंदर पावसाळी गीत आहे. नाही नाही, *बारीश* (१९५७) बद्दल नाही बोलत मी. तर १९६०मध्ये प्रदर्शित झालेल्या *काला बाजार*मधील हे गीत. 'रिमझिम के तराने लेके आई बरसात, याद आये किसी से वह पहली मुलाकात...' गीता दत्त आणि महंमद रफीच्या आवाजातलं हे युगुलगीत ईशान्य भारतातील लोकसंगीतावर आधारित या गीताची बंदिश होती. हे गीत लोकप्रिय होईल का याबाबत सुरुवातीला देव आनंद साशंक होता. पण गीत शांतपणे लक्षपूर्वक ऐकलं तर पत्र्यावर पडणाऱ्या पावसाचा आवाज ऐकू येतो. वाजंत्रीच्या वापरामुळे या वर्षागीताला एक वेगळीच मजा आली आहे.

वर्षागीताबद्दल बोलायचं झालं तर *बैजू बावरा*चा उल्लेख टाळून चालणारच नाही. चित्रपटात हरिदास स्वामी वेगवेगळ्या ऋतूंवर आधारित रागदारी बैजूला शिकवत असतात. संस्कृतमध्ये पावसाला मल हारयति (मळ किंवा घाण दूर करणारा) म्हणून मल्हार असं म्हणतात. तर मेघमल्हार रागातील 'घनन घनन घन बरसे रे...' हे गीत श्रवणीय झालं आहे. यातील 'घनन घनन घन...' हे शब्द विशिष्ट प्रकारे गायल्यामुळे नादमाधुर्याचा आनंद मिळतो. शास्त्रीय संगीताच्या परिभाषेत याला गमक असं म्हणतात. उस्ताद अमीर खाँच्या स्वरातील हे गीत साऊंड रेकॉर्डिस्ट मीनु कामक यांनी अविस्मरणीय केलं आहे. राम मौड मल्हारवर आधारित याच चित्रपटातील महंमद रफीच्या आवाजातील 'झूम झूम बदरीया बरसे...' हे गीत ऐकल्यावर दोन्हीतील फरक लक्षात येईल.


लम्हें : श्रीदेवी


क्रांती : हेमामालिनी


नमक हलाल: स्मिता पाटील-अमिताभ

शास्त्रीय संगीत जाणणाऱ्या गायकाला मुद्दाम चुकीचं गाणं किती कठीण होऊन बसतं हे 'सावन का महिना पवन करे शोर... शो ऽ ऽ र... पवन करे शोर...' या गाण्यावरून लक्षात येतं.

अलीकडच्या चित्रपटात पावसाळी गीतं याचा अर्थ पावसाच्या धारा अंगावर घेत प्रणयात धुंद झालेले नायक-नायिका इतकाच राहिलाय. क्वचित एखादं चांगलं वर्षागीत ऐकायला मिळतं.

नुकताच प्रदर्शित झालेल्या *लगान* चित्रपटात पावसाला अनन्यसाधारण महत्त्व दिलं गेलं आहे. सतत दुसऱ्या वर्षी दुष्काळाचं सावट असलेल्या गावकऱ्यांनी मेघराजाची आळवणी करताना म्हटलेलं 'काले मेघा काले मेघा पानी तो बरसाओ...' हे गीत. बऱ्याच दिवसांनी एक चांगलं गीत ऐकायला मिळाल्याचं समाधान देतं. या गीताविषयी सांगण्यासारखं बरंच काही असलं तरी त्याचा खरा आनंद प्रत्यक्ष पडद्यावर पाहण्यातच आहे. आणि सध्या ते शक्यही आहे.

गेल्या ५०-६० वर्षांत पावसावर इतकी गीतं लिहिली गेली, चंदेरी पडद्यावर झळकली. पण त्या सगळ्यांची दखल घेणं शक्यच नाही. वर्षागीत म्हणून चित्रपट संगीतात वेगळी दिसणाऱ्या गीतांची ही एक झलक होती. ●